जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे कार्यालय

**(पुरवठा शाखा)**

मुख्य प्रशासकीय इमारत सिंधुदुर्ग, मु.- सिंधुदुर्गनगरी, बी विंग, तळमजला, दालन क्र. 120,
तालुका कुडाळ, जिल्हा - सिंधुदुर्ग 416812 02362-228846
ई मेल - dsosindhudurg@yahoo.com , dsosindhudurg1@gmail.com,

NO.SUP-1202/3/2016-नियतन
दिनांक - 01 /04/2020

प्रति,

तहसिलदार सर्व

**विषय:- कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल ते जून 2020 करीता मोफत वितरीत करावयाच्या तांदळाचे मासिक नियतन**

संदर्भः- शासन,अन्न नागरी व पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडील क्रमांक अधापु-2020 /प्र.क्र.-60/ना.पु.22 दिनांक 31 मार्च 2020

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल ते जून-2020 या कालावधीसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याव्यतिरिक्त प्रतिसदस्य प्रतिमाह 5 किलो तांदुळ मोफत वितरीत करण्याचे आदेश उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झालेले आहेत. सदर आदेशानुसार प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रतिसदस्य प्रतिमाह 5 किलो तांदुळ त्याचप्रमाणे अंत्योदय अन्न योजना कुटुंबातील सदस्यांनादेखील त्या कुटुंबामध्ये शिधापत्रिकेतील नोंदीनुसार प्रत्यक्ष असलेल्या सदस्यांनादेखील प्रतिसदस्य प्रतिमाह 5 किलो तांदुळ याच परिमाणात मोफत वितरीत करावयाचे आहे.

**उपरोक्त शासन पत्रानुसार माहे एप्रिल, मे व जून 2020 साठी अन्नधान्याच्या दिलेल्या नियमित नियतनानुसार अन्नधान्याचे वाटप त्या-त्या महिन्यात करावे आणि तद्नंतर जिल्हानिहाय मंजूर करणेत आलेल्या नियतनाचे दिलेल्या परिमाणानुसार लाभार्थ्यांना मोफत तांदळाचे वितरण करणेचे आहे. सदर मोफत तांदळाचे वाटप करताना त्या लाभार्थ्यांनी नियमित अन्नधान्याची उचल केली आहे, याची खातरजमा करण्याचे निर्देश आहेत.**

**अंत्योदय अन्न योजना कुटुंबातील** सदस्यांनादेखील प्रतिसदस्य प्रतिमाह 5 किलो याच परिमाणात मोफत तांदुळ वितरीत करावयाचे आहे. उदा. अंत्योदय अन्न योजना कुटुंबातील लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या नियमित 35 किलो अन्नधान्याचे

वितरण केल्यानंतर सदर अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकेतील सदस्य संख्येनुसार प्रतिसदस्य 5 किलो तांदळाचे मोफत वितरण करावयाचे आहे.

**प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांनादेखील** राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या 5 किलो प्रति सदस्य या परिमाणात अन्नधान्य वितरण केल्यानंतर प्रति सदस्य 5 किलो तांदुळाचे मोफत वितरण करावयाचे आहे.

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल ते जून-2020 या कालावधीसाठी देण्यात येणा-या मोफत अन्नधान्याबाबत रास्त भाव धान्य दुकानदारांना व लाभार्थ्यांना माहिती व्हावी, या दृष्टिकोनातून प्रसिध्दी देण्यात यावी.

अधिक माहितीसाठी सोबत संदर्भिय शासन पत्राची प्रत आहे.

(दादासाहेब गिते)
जिल्हा पुरवठा अधिकारी
सिंधुदुर्ग

प्रत - उपविभागीय अधिकारी कणकवली /कुडाळ सावंतवाडी यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.
प्रत - जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग यांजकडे वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देणेकरीता.